

# गुणवंत प्राचार्य पुरस्कार डॉ. कणसे यांना प्रदान

म. टा. वृत्तसेवा, मिरज

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा 'गुणवंत प्राचार्य पुरस्कार' भारती विद्यापीठाच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांना प्रदान करण्यात आला.

शिवाजी विद्यापीठाच्या ५७व्या वर्धापनदिना निमित्त राजर्षी शाहू सभागृहात प्राचार्य कणसे यांना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी.शिर्के व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले आदींच्या हस्ते गौरविण्यात आले. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. शैक्षणिक अर्हता, अध्ययन, अध्यापन, मूल्यमापन, संशोधन, शिष्यवृत्ती, पुरस्कार, विविध कार्यकारी मंडळाचे अधिकार, विस्तार कार्य, कार्यकारिणीतील सहभाग, विविध कार्यक्रमांचे व परिषदाचे संयोजन आदी निकषांच्या आधारे निवड समितीने डॉ. कणसे यांची एकमताने निवड केली.

कणसे यांनी शैक्षणिक, पर्यावरण व संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. कणसे पदवी व पदव्युत्तर स्तरावर ३३ वर्षे अध्यापन कार्य करीत असून, प्राचार्य पदावर गेली १४ वर्षे कार्यरत आहेत.

पुढारी

# डिजिटल व्यवहाराच्या बळकटीसाठी 'आरबीआय' प्रयत्नशील : सिन्हा

## विद्यापीठात 'ई-पेमेंट व सायबर घोटाळे' विषयी कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कागदोपत्री व्यवहार कमी होऊन डिजिटल पेमेंट, कार्ड पेमेंट याबरोबरच मोबाईल बँकिंगच्या मागणीमध्ये वाढ झाली आहे. ही ग्राहकांच्या मागणीबरोबरच काळाची गरज बनली आहे. त्यामुळे आवश्यक त्या पायाभूत सुविधांमध्ये बळकटी आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. यासाठी 'आरबीआय' सुरक्षित प्रणाली तयार करीत आहे, असे प्रतिपादन रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया विभागीय कार्यालय, मुंबईच्या सहायक महाव्यवस्थापक अरुंधती सिन्हा यांनी केले.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'ई-पेमेंट व सायबर घोटाळे' या विषयावरील कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना 'आरबीआय' विभागीय कार्यालय, मुंबईच्या सहायक महाव्यवस्थापक अरुंधती सिन्हा. व्यासपीठावर डॉ. विजय ककडे, डॉ. डी. सी. तळुले आदी.**

शिवाजी विद्यापीठाच्या बँक ऑफ इंडिया अध्यासन व रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने 'ई-पेमेंट व सायबर घोटाळे' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर अध्यक्षस्थानी होते. यावेळी 'आरबीआय' मुंबई येथील विभागीय कार्यालयाचे व्यवस्थापक अंकुर सिंग यांची प्रमुख उपस्थिती होती.

सिन्हा म्हणाल्या, नव्या तंत्र प्रगत बँकिंग व्यवस्थेचा ई-पेमेंट हा भाग असून त्याबाबत जनजागृती करण्याचे काम रिझर्व्ह बँकेने हाती घेतले असून तीन वर्षांचा आराखडा तयार केला आहे. ग्राहकांना जलदगतीने, सुरक्षितपणे आर्थिक व्यवहार पूर्ण करण्यासाठी ई-पेमेंटची व्यापकता वाढविण्याचे काम सुरू आहे. देशामध्ये आर्थिक व्यवहार करीत असताना ओटीपीद्वारे प्रमाणीकरण करण्याच्या पद्धती अवलंबल्या जात आहेत. रोख आर्थिक व्यवहार कमी करून डिजिटल व्यवहारांकडे जनसामान्यांचा कल वाढविण्याची प्रक्रिया दीर्घकालीन असली तरी त्या दृष्टीने प्रयत्न होणे गरजेचे आहे.

डॉ. नांदवडेकर म्हणाले, इंटरनेटच्या माध्यमातून जगामध्ये बकिंग व्यवहारामध्ये काही चुकीच्या आणि गुन्हेगारी स्वरूपाच्या घटना घडत आहेत. त्यासाठी बँक, वित्त आणि ऑनलाईन डिजिटल व्यवहारांमध्ये सायबर सुरक्षा अधिक सक्षम करण्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. याप्रसंगी बँक ऑफ इंडिया कोल्हापूर लिड बँकेचे विभागीय व्यवस्थापक नितीन देशपांडे, अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. डी.सी. तळुले यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यापीठाच्या बँक ऑफ इंडिया चेअर इन रूरल बँकिंगचे समन्वयक .व्ही.बी. ककडे यांनी प्रास्ताविक केले. याप्रंसगी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, अनिल पाटील यांच्यासह विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक, प्रशासकीय सेवक उपस्थित होते.

लोकमत

## अरुंधती सिन्हा : 'ई-पेमेंट व सायबर घोटाळे' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा

# पेमेंट पद्धती हा अर्थव्यवस्थेचा महत्त्वपूर्ण कणा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** बँकिंग क्षेत्रामधील पेमेंट पद्धती हा अर्थव्यवस्थेचा महत्वाचा कणा आहे. डिजिटल व्यवहारांसाठी लोकपाल सुरक्षा पद्धती चांगल्या प्रकारे कार्यान्वित झालेली आहे. अनेक तरुणांना या क्षेत्रामधील नोकरीच्या संधी उपलब्ध झालेल्या आहेत, असे प्रतिपादन रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, विभागीय कार्यालय, मुंबई येथील साहाय्यक महाव्यवस्थापक अरुंधती सिन्हा यांनी गुरुवारी येथे केले.

### तीन आराखडे

नव्या तंत्र प्रगत बँकिंग व्यवस्थेचा ई-पेमेंट हा भाग असून, त्याबाबत जनजागृती करण्याचे काम रिझर्व्ह बँकेने हाती घेतले आहे. यासाठी तीन वर्षांचा आराखडा तयार केला असून सुरक्षित, खात्रिशीर, परवडणारी ई-देय प्रणाली करीत असताना खर्चघट, स्पर्धा वाढ, सोईस्करता व विश्वसनीयता हे चार महत्त्वाचे घटक आहेत, असेही अरुंधती सिन्हा यांनी सांगितले.



शिवाजी विद्यापीठाच्या बँक ऑफ इंडिया अध्यासन आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्यातर्फे 'ई-पेमेंट व सायबर घोटाळे' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीमध्ये करण्यात आले. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर अध्यक्षस्थानी होते.

यावेळी सिन्हा म्हणाल्या, सुरक्षित आर्थिक व्यवहारांमध्ये जलदता आणण्यासाठी संपूर्ण बँकिंग उद्योगांसह अन्य पेमेंट सिस्टीम ऑपरेटर्सनाही या प्रणालीबाबत सहकार्य करण्याची आवश्यकता आहे. रोख आर्थिक व्यवहार कमी करून डिजिटल व्यवहारांकडे जनसामान्यांचा कल वाढविण्याची प्रक्रिया दीर्घकालीन असली तरी त्यादृष्टीने प्रयत्न होणे गरजेचे आहे. डिजिटल व्यवहारांसाठी आरबीआय एक सुरक्षित प्रणाली तयार करीत आहे.

अध्यक्षीय भाषणामध्ये डॉ. विलास नांदवडेकर म्हणाले, बँक, वित्त, ऑनलाईन डिजिटल व्यवहारांमध्ये सायबर सुरक्षा अधिक सक्षम करण्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. आरबीआय मुंबई येथील विभागीय कार्यालयाचे व्यवस्थापक अंकुर सिंग, आदी उपस्थित होते. बँक ऑफ इंडिया कोल्हापूर, लीड बँकेचे विभागीय व्यवस्थापक नितीन देशपांडे आणि अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. डी. सी. तळुले यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले. विद्यापीठाच्या बँक ऑफ इंडिया चेअर इन रुरल बँकिंगचे समन्वयक डॉ. व्ही. बी. ककडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. याप्रसंगी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, अनिल पाटील, आदी उपस्थित होते.

# व्यवहारातील बळकटीसाठी आरबीआय प्रयत्नशील

## अरुंधती सिन्हा : विद्यापीठात 'ई-पेमेंट व सायबर घोटाळे' विषयावर कार्यशाळा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

आज कागदोपत्री व्यवहार कमी होऊन डिजिटल पेमेंट, कार्ड पेमेंटसह मोबाईल बँकिंगच्या मागणीतील वाढ ही काळाची गरज बनलेली आहे. त्यामुळे आवश्यक त्या पायाभूत सुविधांमध्ये बळकटी आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. यासाठी आरबीआय एक सुरक्षित प्रणाली तयार करत आहे, असे प्रतिपादन रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मुंबई विभागीय कार्यालयातील सहायक महाव्यवस्थापक अरुंधती सिन्हा यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात बँक ऑफ इंडिया अध्यासन आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने 'ई-पेमेंट व सायबर घोटाळे' या विषयावर आयोजित कार्यशाळेत त्या बोलत होत्या. विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीमध्ये ही कार्यशाळा पार पडली. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते. यावेळी आरबीआय मुंबई येथील विभागीय कार्यालयाचे व्यवस्थापक अंकुर सिंग, बँक ऑफ इंडिया कोल्हापूरचे विभागीय व्यवस्थापक नितीन देशपांडे उपस्थित होते.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यशाळेत बोलताना आरबीआयच्या सहायक महाव्यवस्थापक अरुंधती सिन्हा. सोबत इतर मान्यवर.**

सिन्हा पुढे म्हणाल्या, नव्या तंत्र प्रगत बँकिंग व्यवस्थेचा ई पेमेंट हा भाग असून त्याबाबत जनजागृती करण्याचे काम रिझर्व्ह बँकेने हाती घेतले आहे. यासाठी तीन वर्षांचा आराखडा तयार केला असून सुरक्षित, खात्रीशीर, परवडणारी ई-देय प्रणाली विकसित करण्यात येत आहे.

डॉ. विलास नांदवडेकर म्हणाले, सायबर गुन्ह्यांकडे गंभीरतेने व सातत्याने लक्ष देणे आवश्यक आहे. इंटरनेटच्या माध्यमातून जगामध्ये बँकिंग व्यवहारामध्ये काही चुकीच्या आणि गुन्हेगारी स्वरूपाच्या घटना घडत आहेत. त्यासाठी बँक, वित्त आणि ऑनलाईन डिजिटल व्यवहारांमध्ये सायबर सुरक्षा अधिक सक्षम करण्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

यावेळी बँक ऑफ इंडिया लीड बँकेचे विभागीय व्यवस्थापक नितीन देशपांडे आणि अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. तळुले डी. सी. यांचीही भाषणे झाली. विद्यापीठाच्या बँक ऑफ इंडिया चेअर इन रुरल बँकिंगचे समन्वयक डॉ. व्ही. बी. ककडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. कार्यशाळेस ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, अनिल पाटील यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते.

# डिजिटल सुविधांसाठी प्रयत्नशील

## अरुंधती सिन्हा ; बँक ऑफ इंडिया अध्यासनातर्फे 'ई-पेमेंट'वर कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २१ : 'आज कागदोपत्री व्यवहार कमी होऊन डिजिटल पेमेंट, कार्ड पेमेंटबरोबरच मोबाईल बँकिंगच्या मागणीमध्ये वाढ झाली आहे. वाढ ही ग्राहकांच्या मागणीबरोबरच काळाची गरज आहे. त्यामुळे आवश्यक पायाभूत सुविधांमध्ये बळकटी आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. यासाठी आरबीआय सुरक्षित प्रणाली तयार करीत आहे', असे प्रतिपादन रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया विभागीय कार्यालय मुंबई येथील सहायक महाव्यवस्थापक अरुंधती सिन्हा यांनी आज केले.

शिवाजी विद्यापीठाच्या बँक ऑफ इंडिया अध्यासन आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने 'ई-पेमेंट व सायबर घोटाळे' या विषयावर कार्यशाळेत त्या बोलत होत्या. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर अध्यक्षस्थानी होते.



आरबीआय मुंबई येथील विभागीय कार्यालयाचे व्यवस्थापक अंकुर सिंग, बँक ऑफ इंडिया कोल्हापूरचे विभागीय व्यवस्थापक नितीन देशपांडे यांची उपस्थिती होती.

अरुंधती सिन्हा म्हणाल्या, ''नव्या तंत्र प्रगत बँकिंग व्यवस्थेचा ई पेमेंट हा भाग असून, त्याबाबत जनजागृती करण्याचे काम रिझर्व्ह बँकेने हाती घेतले आहे. यासाठी आराखडा तयार केला असून, सुरक्षित, खात्रीशीर, परवडणारी ई देय प्रणाली करीत असताना खर्च घट, स्पर्धावाढ, विश्वसनीयता हे चार महत्त्वाचे घटक आहेत. ग्राहकांना जलदगतीने, सुरक्षितपणे आर्थिक व्यवहार पूर्ण करण्यासाठी ई-पेमेंटची व्यापकता वाढविण्याचे काम सुरू आहे. मागील पंधरा वर्षांत मोबाईल बँकिंग नव्हते. देशामध्ये आर्थिक व्यवहार करीत असताना ओटीपीद्वारे प्रमाणिकरण करण्याच्या पध्दती अवलंबल्या जात आहेत.



**कोल्हापूर : व्याख्यानात बोलताना अरुंधती सिन्हा.**

अध्यक्षीय भाषणात डॉ. विलास नांदवडेकर म्हणाले, ''सायबर गुन्ह्यांकडे गंभीरतेने व लक्ष देणे आवश्यक आहे. इंटरनेटच्या माध्यमातून जगामध्ये बँकिंग व्यवहारामध्ये चुकीच्या आणि गुन्हेगारी स्वरूपाच्या घटना घडत आहेत. त्यासाठी बँक, वित्त आणि ऑनलाईन डिजिटल व्यवहारांमध्ये सायबर सुरक्षा अधिक सक्षम करण्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.''

याप्रसंगी बँक ऑफ इंडिया कोल्हापूर, लीड बँकचे विभागीय व्यवस्थापक नितीन देशपांडे आणि अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. तळुले, डी. सी. यांनीही मनोगत व्यक्त केले. विद्यापीठाच्या बँक ऑफ इंडिया चेअर इन रुरल बँकिंगचे समन्वयक डॉ. व्ही. बी. ककडे यांनी स्वागत केले. याप्रसंगी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, अनिल पाटील यांसह विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक, प्रशासकीय सेवक उपस्थित होते.

# डिजिटल व्यवहार सुरक्षेसाठी लवकरच अद्ययावत प्रणाली

## आरबीआय विभागीय कार्यालय मुंबई येथील सहाय्यक महाव्यवस्थापक अरुंधती सिन्हा यांची माहिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

कागदोपत्री व्यवहार कमी होऊन डिजिटल पेमेंट, कार्ड पेमेंट याबरोबरच मोबाईल बँकिंगच्या मागणीमध्ये झालेली वाढ पाहता डिजिटल व्यवहार ग्राहकांची काळाची गरज बनली आहे. त्यामुळे आवश्यक त्या पायाभूत सुविधांमध्ये बळकटी आणण्यासाठी आरबीआय एक सुरक्षित प्रणाली तयार करीत आहे, असे प्रतिपादन रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया विभागीय कार्यालय मुंबई येथील सहाय्यक महाव्यवस्थापक अरुंधती सिन्हा यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील बँक ऑफ इंडिया अध्यासन आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने 'ई-पेमेंट व सायबर घोटाळे' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. विद्यापीठातील मानव्यशास्त्र इमारतीमध्ये झालेल्या या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर अध्यक्षस्थानी होते. आरबीआय मुंबई येथील विभागीय कार्यालयाचे व्यवस्थापक अंकुर सिंग, बँक ऑफ इंडिया कोल्हापूरचे विभागीय व्यवस्थापक नितीन देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.




**कोल्हापूर : बँक ऑफ इंडिया अध्यासन आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्याख्यानात मार्गदर्शन करताना अरुंधती सिन्हा.**

सिन्हा पुढे म्हणाल्या, नव्या प्रगत बँकिंग व्यवस्थेचा ई-पेमेंट हा भाग असून त्याबाबत जनजागृती करण्याचे काम रिझर्व्ह बँकेने हाती घेतले आहे. यासाठी तीन वर्षांचा आराखडा तयार केला असून सुरक्षित, खात्रीशीर, परवडणारी ई देय प्रणाली करत असताना खर्च घट, स्पर्धावाढ, सोईस्करता व विश्वसनीयता हे महत्त्वाचे घटक आहेत. भविष्यात अद्ययावत तंत्रज्ञानामुळे बँकिंग आणि

### नोकरीच्या संधी

बँकिंग क्षेत्रामधील पेमेंट पद्धती हा अर्थव्यवस्थेतील महत्वपूर्ण कणा आहे. डिजिटल व्यवहारांसाठी लोकपाल सुरक्षा पद्धती चांगल्या प्रकारे कार्यान्वित झाली आहे. त्यामुळे अनेक तरुणांना या क्षेत्रामधील नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत, असे सिन्हा म्हणाल्या.

वित्त क्षेत्रामध्ये आमुलाग्र बदल होणार आहेत.

अध्यक्षस्थानावरून कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर म्हणाले, इंटरनेटच्या माध्यमातून जगामध्ये बँकिंग व्यवहारामध्ये काही चुकीच्या आणि गुन्हेगारी स्वरूपाच्या घटना घडत आहेत.

यावेळी बँक ऑफ इंडिया कोल्हापूर, लिड बँकचे विभागीय व्यवस्थापक नितीन देशपांडे, अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. डी. सी. तळुले यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. व्ही. बी. ककडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

लोकमत

## कुलगुरु चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा : पुणे, अकोला, राहुरी, पतियाळा, रोहटकही विजयी

# शिवाजी विद्यापीठाची आगेकूच

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या अखिल भारतीय कुलगुरु चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेच्या साखळी फेरीत यजमान शिवाजी विद्यापीठ संघाने नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा नऊ गडी राखून पराभव केला. अन्य सामन्यांत पुणे, अकोला, राहुरीसह पतियाळा, रोहटक या विद्यापीठांनी विजय मिळविले.

सकाळच्या सत्रात शिवाजी विद्यापीठ संघाने नांदेड विद्यापीठ संघावर मात केली. प्रथम फलंदाजी करताना नांदेड संघाने १२.१ षटकांत सर्वबाद ७० धावा केल्या. गोलंदाजीत शिवाजी विद्यापीठ संघाकडून अजय आयरेकर यांनी चार षटकांत २७ धावांत हॅट्ट्रिकसह ४ बळी टिपण्याची कामगिरी बजावली. त्यानंतर विश्वनाथ वरुटे यांनीही हॅट्ट्रिक नोंदविली. योगेश दळवी यांनी २ तर रमेश ढोणुक्षे यांनी १ बळी मिळविला.

प्रत्युत्तरात ७० धावांचे हे आव्हान कप्तान सागर पवार यांनी राजेश कोळी आणि विनायक शिंदे यांच्या साथीने



अ.भा. कुलगुरु चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत गुरुवारी नांदेडविरुद्ध जोरदार फटका लगावताना शिवाजी विद्यापीठाचे कर्णधार सागर पवार.

८.१ षटकांतच पूर्ण केले. अजय आयरेकर 'सामनावीर' ठरले

पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला संघाने महर्षी दयानंद सरस्वती विद्यापीठ, अजमेर संघावर मात केली. अकोलाकडून ५५ धावांची नाबाद अर्धशतकी खेळी

### आजचे सामने असे :

**सकाळचे सत्र** (स. ८.३० वा.) :

- शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर वि. लाला लजपतराय पशुविज्ञान विद्यापीठ, हिस्सार
- जम्मू विद्यापीठ, जम्मू वि. पंजाबी विद्यापीठ, पतियाळा
- मुंबई विद्यापीठ, मुंबई वि. महर्षी दयानंद सरस्वती विद्यापीठ, अजमेर

**दुपारचे सत्र** (दु. १ वा.):

- पंजाब कृषी विद्यापीठ, लुधियाना वि. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
- शेर-ए-काश्मीर कृषी विज्ञान व तंत्रज्ञान विद्यापीठ, जम्मू वि. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
- पंजाब विद्यापीठ, चंदिगढ वि. हिमाचल प्रदेश विद्यापीठ, सिमला

करणारा अनुज राऊत सामनावीर ठरला. दुपारच्या सत्रात महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी विरुद्धच्या सामन्यात अवघ्या ७ धावांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर संघाला पराभूत व्हावे लागले. प्रथम फलंदाजी करताना राहुरीच्या संघाने १७.४ षटकांत ११८ धावा केला.

प्रत्युत्तरात नागपूरने २० षटकांत ७ बाद १११ धावापर्यंत मजल मारली. राहुरीचा सतपाल गायकवाड सामनावीर ठरला. जम्मूच्या शेर-ए-काश्मीर कृषी विज्ञान व तंत्रज्ञान विद्यापीठाविरुद्ध झालेल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना पुण्याच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने २० षटकांत ७ बाद १४६ धावा केल्या. प्रत्युत्तरात शेर-ए-काश्मीर संघाने २० षटकांत ८ बाद १३६ धावा केल्या. ५१ धावांची खेळी आणि २४ धावांत ३ बळी अशी कामगिरी बजावणारा पुण्याचा विनोद नरके सामनावीर ठरला. मुंबई विद्यापीठविरुद्धच्या सामन्यात पंजाबी विद्यापीठाने १६१ धावांचे आव्हान ठेवले. प्रत्युत्तरात मुंबई विद्यापीठाचा संघ २० षटकांत ८ बाद १३४ इतकीच धावसंख्या उभारू शकला. मुंबईच्या सिद्धेश चव्हाण याने



शिवाजी विद्यापीठाचे हॅट्ट्रिकवीर अजय आयरेकर व विश्वनाथ वरुटे

नाबाद ७४ धावा करीत एकाकी झुंज दिली. पंजाबी विद्यापीठाचा गुरुप्रीत सिंग सामनावीर ठरला.

महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहटक विरुद्धच्या सामन्यात सिमला विद्यापीठाने प्रथम फलंदाजी करताना रोहटकसमोर ८ बाद १२८ धावांचे आव्हान ठेवले. नरेंद्र कुमारच्या ३८ आणि गौरव कुमारच्या ४३ धावांच्या बळावर रोहटकच्या संघाने हे आव्हान पूर्ण केले. ३८ धावांसह १ बळी घेणारा रोहटकचा नरेंद्र कुमार सामनावीर ठरला.

पुण्य नगरी

# शिवाजी विद्यापीठाची विजयी घोडदौड

## कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा : आयरेकर, वरुटे यांची हॅटट्रिक : पुणे, अकोला, राहुरीसह पतियाळा, रोहतक संघ विजयी

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या अखिल भारतीय कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेच्या साखळी फेरीत यजमान शिवाजी विद्यापीठ संघाने गुरुवारी तिसऱ्या दिवशीही आपली विजयी घोडदौड सुरूच ठेवली. शिवाजी विद्यापीठाच्या संघाने नांदेडच्या स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा ९ गडी राखून पराभव केला. विद्यापीठाचे अजय आयरेकर आणि विश्वनाथ वरुटे यांच्या एकाच सामन्यातील दोन हॅटट्रिकची चर्चा दिवसभर सुरू होती. अन्य सामन्यांत पुणे, अकोला, राहुरीसह पतियाळा, रोहतक या विद्यापीठांनी विजय मिळवला.

गुरुवारी सकाळच्या सत्रात शिवाजी विद्यापीठ आणि नांदेड विद्यापीठ यांच्यातील सामना अक्षरशः एकतर्फी स्वरूपाचा झाला. सामना विद्यापीठाच्या गोलंदाजांनी गाजवला. नाणेफेक जिंकून शिवाजी विद्यापीठाने नांदेड संघाला प्रथम फलंदाजीला पाचारण केले. नांदेड संघाला अवघ्या १२.१ षटकांत ७० धावांत गुंडाळण्यात शिवाजी विद्यापीठाच्या संघाला यश आले. यामध्ये अजय आयरेकर यांनी चार षटकांत २७ धावांत हॅटट्रिकसह ४ बळी टिपण्याची कामगिरी बजावली. विश्वनाथ वरुटे यानेही हॅटट्रिक नोंदवली. योगेश दळवी याने २, तर रमेश ढोणुक्षे याने १ बळी मिळवला. ७० धावांचे हे आव्हान कप्तान सागर पवार याने राजेश कोळी आणि विनायक शिंदे यांच्या साथीने ८.१ षटकांतच गाठले. अजय आयरेकर याला सामनावीर घोषित करण्यात आले.





कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ संघातील हॅट्ट्रिक वीर अजय आयरेकर व विश्वनाथ वरुटे. उजवीकडे फटका मारताना विद्यापीठाचा कर्णधार सागर पवार.

पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला आणि महर्षी दयानंद सरस्वती विद्यापीठ, अजमेर यांच्या दरम्यानचा सामना अत्यंत चुरशीचा झाला. अकोला विद्यापीठाच्या १२३ धावांचा पाठलाग करताना अजमेर संघाला मात्र अखेरीस तीन धावांनी पराभव स्वीकारावा लागला.

दुपारच्या सत्रातील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर यांच्यातील सामनाही चुरशीचा झाला. नागपूर विद्यापीठाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी घेतली आणि राहुरीच्या संघाला १७.४ षटकांत ११८ धावांत तंबूत धाडले. नागपूरच्या दीपक घोडमारे याने ३, तर रितेश पुरकम याने २ बळी घेतले. प्रत्युत्तरादाखल खेळताना नागपूर विद्यापीठाचा संघ २० षटकांत ७ बाद १११ धावाच करू शकला. अवघ्या ७ धावांनी त्यांना पराभूत व्हावे लागले. पुण्याच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने आपल्या विजयाचे खाते उघडले. त्यांनी जम्मूच्या शेर-ए-काश्मीर कृषी विज्ञान व तंत्रज्ञान विद्यापीठाचा पराभव केला. मुंबई विद्यापीठाला मात्र पतियाळाच्या पंजाबी विद्यापीठाकडून २७ धावांनी पराभव स्वीकारावा लागला.

### सकाळचे सत्र (स. ८.३० वा.)

- शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर वि. लाला लजपतराय पशुविज्ञान विद्यापीठ, हिस्सार
- जम्मू विद्यापीठ, जम्मू वि. पंजाबी विद्यापीठ, पतियाळा
- मुंबई विद्यापीठ, मुंबई वि. महर्षी दयानंद सरस्वती विद्यापीठ, अजमेर

### दुपारचे सत्र (दु. १ वा.)

- पंजाब कृषी विद्यापीठ, लुधियाना वि. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
- शेर-ए-काश्मीर कृषी विज्ञान व तंत्रज्ञान विद्यापीठ, जम्मू वि. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
- पंजाब विद्यापीठ, चंदीगढ वि. हिमाचल प्रदेश विद्यापीठ, सिमला

# शिवाजी विद्यापीठाची विजयी घोडदौड कायम

## १७ वी आंतरविद्यापीठ कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा : नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठावर ९ गडी राखून विजय

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाने गुरूवारी झालेल्या सामन्यात नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठावर ९ गडी राखून मात करत विजयी घौडदौड सुरू ठेवली. या एकाच सामन्यात शिवाजी विद्यापीठाचे गोलंदाज अजय आयरेकर व विश्वजीत वरुटे यांनी हॅट्ट्रिक साधत अर्धा संघ गारद करून ऐतिहासिक कामगिरी बजावली. तसेच अजय आयरेकरने सामनावीरचा बहुमान पटकविला. शिवाजी विद्यापीठाच्या मैदानावर सुरू असलेल्या १७ वी अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत गुरूवारी कोल्हापूरसह पुणे, अकोला, राहुरी, पटियाळा, रोहटक संघांनी प्रतिस्पर्धी संघांवर मात करून विजय संपादन केले.

शिवाजी विद्यापीठ आणि नांदेड विद्यापीठ यांच्यातील सामना एकतर्फी झाला. गुरूवारचा दिवस विद्यापीठाच्या गोलंदाजांनी गाजविला. नाणेफेक जिंकून शिवाजी विद्यापीठाने नांदेड संघाला प्रथम फलंदाजीला पाचारण केले. नांदेड संघाला अवघ्या १२.१ षटकांत ७० धावांत गुंडाळण्यात शिवाजी विद्यापीठाच्या संघाला यश आले. यामध्ये अजय आयरेकर यांनी चार षटकांत २७ धावांत हॅटट्रीकसह ४ बळी टिपण्याची लक्षवेधी कामगिरी बजावली. तर विश्वनाथ वरुटे यानेही हॅटट्रीक साधण्यात यश मिळविले. त्यांना योगेश दळवीने २ तर रमेश ढोणुक्षेने १ बळी मिळवत साथ दिली. नांदेड संघाचे ७० धावांचे हे आव्हान कप्तान सागर पवार, राजेश कोळी व विनायक शिंदे यांनी धुव्वादार फलंदाजीचे प्रदर्शन घडवत ८.१ षटकांतच गाठले. अजय आयरेकर यांना सामनावीर घोषित करण्यात आले.

यानंतर पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला विरुध्द महर्षी दयानंद सरस्वती विद्यापीठ, अजमेर यांच्यातील सामना चुरशीचा झाला. अकोला विद्यापीठाच्या १२३ धावांचा पाठलाग करताना सुरिंदर कुमावत यांनी ४८ धावांची खेळी केली. कुमावत पायचीत झाल्यानंतर अजमेर संघाचा कोसळणारा डाव संदीप चक्रवर्ती यांनी सावरण्याचा प्रयत्न करीत ३१ धावांची महत्त्वाची खेळी केली. मात्र अखेरीस तीन धावांनी त्यांना पराभव स्वीकारावा लागला. अकोल्याकडून ५५ धावांची नाबाद अर्धशतकी खेळी करणाऱ्या अनुज राऊत याला सामनावीर घोषित करण्यात आले.



हॅट्ट्रिक नोंदवणारे शिवाजी विद्यापीठाचे आयरेकर व विश्वजीत वरुटे चषकासह.

**राहुरी विद्यापीठाची आगेकूच**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी विरुध्द राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर यांच्यातील सामना अतितटीचा झाला. नागपूर विद्यापीठाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी घेतली आणी राहुरीच्या संघाला १७.४ षटकांत ११८ धावांत तंबूत धाडण्यात यश मिळाले. नागपूरच्या दीपक घोडमारे यांनी ३ तर रितेश पुरकम यांनी २ बळी घेतले. प्रत्युत्तरादाखल खेळताना नागपूर विद्यापीठाचा संघ २० षटकांत ७ बाद १११ धावाच करू शकला. अवघ्या ७ धावांनी त्यांना पराभूत व्हावे लागले. आठव्या क्रमांकावर खेळण्यास येऊन ३९ धावांची उपयुक्त खेळी उभारण्यासह ३ बळी टिपण्याची कामगिरी करणारा राहुरीचा सतपाल गायकवाड सामनावीर ठरला.



यानंतर झालेल्या सामन्यात पुण्याच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने विजयाचे खाते उघडले. जम्मूच्या शेर-ए-काश्मीर कृषी विज्ञान व तंत्रज्ञान विद्यापीठाविरोधात खेळताना पुण्याच्या संघाने २० षटकांत ७ बाद १४६ धावा केल्या. पुण्याच्या विनोद नरके (५१) आणि मनिष गायकवाड (५४) यांनी अर्धशतकी खेळी करून संघाच्या धावसंख्येस आकार दिला. प्रत्युतरादाखल शेर-ए-काश्मीर विद्यापीठाचा संघ २० षटकांत ८ बाद १३६ धावाच करू शकला. पुणे संघ ११ धावांनी विजयी झाला.

मुंबई विद्यापीठाला मात्र पटियाळाच्या पंजाबी विद्यापीठाकडून २७ धावांनी पराभव पत्करावा लागला. पंजाबी विद्यापीठाने मुंबईसमोर १६१ धावांचे आव्हान ठेवले. प्रत्युतरादाखल खेळताना मुंबई विद्यापीठाचा संघ २० षटकांत ८ बाद १३४ इतकीच धावसंख्या उभारू शकला. मुंबईच्या सिद्धेश चव्हाण याने नाबाद ७४ धावा करीत विजयासाठी एकाकी झुंज दिली.

**आजचे सामने : - सकाळचे सत्र (स. ८.३० वा.)**

- शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर वि. लाला लजपतराय पशुविज्ञान विद्यापीठ, हिस्सार
- जम्मू विद्यापीठ, जम्मू वि. पंजाबी विद्यापीठ, पतियाळा
- मुंबई विद्यापीठ, मुंबई वि. महर्षी दयानंद सरस्वती विद्यापीठ, अजमेर

**दुपारचे सत्र (दु. १ वा.)**

- पंजाब कृषी विद्यापीठ, लुधियाना वि. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
- शेर-ए-काश्मीर विद्यापीठ, जम्मू वि. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
- पंजाब विद्यापीठ, चंदिगढ वि. हिमाचल प्रदेश विद्यापीठ, सिमला

# शिवाजी विद्यापीठाचा विजय

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या अखिल भारतीय कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेच्या साखळी फेरीत यजमान शिवाजी विद्यापीठ संघाने नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा नऊ गडी राखून पराभव केला. विद्यापीठाचे अजय आयरेकर आणि विश्वनाथ वरुटे या दोघांनी हॅटट्रिक साजरी केली. अन्य सामन्यांत पुणे, अकोला, राहुरीसह पतियाळा, रोहटक या विद्यापीठांनी विजय मिळविले.

आज सकाळच्या सत्रात शिवाजी विद्यापीठाने नांदेड संघाला प्रथम फलंदाजीला पाचारण केले. नांदेड संघाला अवघ्या १२.१ षटकांत ७० धावांत गुंडाळले. यामध्ये अजय आयरेकरने चार षटकांत २७ धावांत हॅटट्रीकसह चार बळी टिपण्याची कामगिरी बजावली. त्यानंतर विश्वनाथ वरुटेने हॅटट्रिक साजरी केली. योगेश दळवी यांनी दोन तर रमेश ढोणुक्षेने एक बळी मिळविला. नांदेडची धाव संख्या एक गडी गमावून पार करत शिवाजी विद्यापीठाने सामना जिंकला.



कुलगुरू चषक क्रिकेट

दुपारच्या सत्रातील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर यांच्यात सामना झाला. राहुरी विद्यापीठाने प्रथम फलंदाजी करताना ११८ धावा केल्या. नागपूरच्या दीपक पोडमारेने तीन तर रितेश पुरकमने दोन बळी घेतले. प्रत्युत्तरादाखल खेळताना नागपूर विद्यापीठाचा संघ २० षटकांत ७ बाद १११ धावाच करू शकल्याने त्यांचा सात धावांनी पराभव झाला.

पुण्याच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने जम्मूच्या शेर-ए-काश्मीर कृषी विज्ञान व तंत्रज्ञान विद्यापीठावर दहा धावांनी विजय मिळवला. पुणे विद्यापीठाने २० षटकांत ७ बाद १४६ धावा केल्या. पुण्याच्या विनोद नरके (५१) आणि मनिष गायकवाड (५४) यांनी अर्धशतकी खेळी करून संघाच्या धावसंख्येस आकार दिला. प्रत्युत्तरादाखल शेर-ए-काश्मीर विद्यापीठाचा संघ २० षटकांत ८ बाद १३६ धावाच करू शकला. धडाकेबाज ५१ धावांची खेळी आणि २४ धावांत ३ बळी अशी कामगिरी बजावणारा पुण्याचा विनोद नरके सामनावीर ठरला.

मुंबई विद्यापीठाला मात्र पतियाळाच्या पंजाबी विद्यापीठाकडून २७ धावांनी पराभव स्वीकारावा लागला. प्रथम फलंदाजी करताना पंजाबी विद्यापीठाने मुंबईसमोर १६१ धावांचे आव्हान ठेवले. मुंबई विद्यापीठाचा संघ २० षटकांत ८ बाद १३४ धावा करू शकला. सिद्धेश चव्हाण याने नाबाद ७४ धावा केल्या.

# शिवाजी विद्यापीठाची विजयी आगेकूच

## कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा; पुणे, अकोला, राहुरी, रोहटक संघांचेही विजय

**कोल्हापूर, ता. २१: शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या अखिल भारतीय कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेच्या साखळी फेरीत यजमान शिवाजी विद्यापीठ संघाने आज तिसऱ्या दिवशीही आपली विजयी वाटचाल सुरू ठेवली. शिवाजी विद्यापीठाच्या संघाने नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा ९ गडी राखून पराभव केला. विद्यापीठाचे अजय आयरेकर, विश्वनाथ वरुटे यांच्या एकाच सामन्यातील दोन हॅटट्रिकची चर्चा दिवसभर होत राहिली. अन्य सामन्यांत पुणे, अकोला, राहुरीसह पटियाळा, रोहटक या विद्यापीठांनी विजय मिळविले.**



**कोल्हापूर : अखिल भारतीय कुलगुरू चषक टि-२० क्रिकेट स्पर्धेत गुरुवारी शिवाजी विद्यापीठाच्या मैदानावर झालेल्या राहुरी विद्यापीठाच्या भानुदास राठोड याला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महेंद्र बनकर याने पायचीत केला तो क्षण.** ( बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा )

शिवाजी विद्यापीठ आणि नांदेड विद्यापीठ यांच्यातील सामना एकतर्फी झाला. नाणेफेक जिंकून शिवाजी विद्यापीठाने नांदेड संघाला प्रथम फलंदाजीला पाचारण केले. नांदेड संघाला अवघ्या १२.१ षटकांत ७० धावाच करता आल्या. यामध्ये अजय आयरेकर यांनी चार षटकांत २७ धावांत हॅटट्रीकसह ४ बळी टिपण्याची कामगिरी बजावली. त्यानंतर विश्वनाथ वरुटे यानेही हॅटट्रीक नोंदविली. योगेश दळवी यांनी २ तर रमेश ढोणुक्षे यांनी १ बळी मिळविला. ७० धावांचे हे आव्हान कप्तान सागर पवार यांनी राजेश कोळी आणि विनायक शिंदे यांच्या साथीने ८.१ षटकांतच गाठले. अजय आयरेकर यांना सामनावीर घोषित करण्यात आले.

पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला आणि महर्षी दयानंद सरस्वती विद्यापीठ अजमेर यांच्या दरम्यानचा सामना अत्यंत चुरशीचा झाला. अकोला विद्यापीठाच्या १२३ धावांचा पाठलाग करताना सुरिंदर कुमावत यांनी ४८ धावांची खेळी केली. कुमावत पायचीत झाल्यानंतर अजमेर संघाचा कोसळणारा डाव संदीप चक्रवर्ती यांनी सावरण्याचा प्रयत्न करीत ३१ धावांची महत्त्वाची खेळी केली. मात्र, अखेरीस तीन धावांनी त्यांना पराभव स्वीकारावा लागला.

दुपारच्या सत्रातील महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर यांच्यातील सामनाही असाच चुरशीचा झाला. नागपूर विद्यापीठाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी घेतली आणि राहुरीच्या संघाला १७.४ षटकांत ११८ धावांत तंबूत धाडले. नागपूरच्या दीपक घोडमारे यांनी ३ तर रितेश पुरकम यांनी २ बळी घेतले. प्रत्युत्तरादाखल नागपूर विद्यापीठाचा संघ २० षटकांत ७ बाद १११ धावाच करू शकला. अवघ्या ७ धावांनी त्यांना पराभूत व्हावे लागले. पुण्याच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने आज विजयाचे खाते उघडले. जम्मूच्या शेर-ए-काश्मीर कृषी विज्ञान व तंत्रज्ञान विद्यापीठाविरोधात खेळताना पुण्याच्या संघाने २० षटकांत ७ बाद १४६ धावा केल्या. पुण्याच्या विनोद नरके ५१ आणि मनिष गायकवाड ५४ यांनी अर्धशतकी खेळी करून संघाच्या धावसंख्येस आकार दिला. प्रत्युत्तरादाखल शेर-ए-काश्मीर विद्यापीठाचा संघ २० षटकांत ८ बाद १३६ धावाच करू शकला. पुणे संघ ११ धावांनी विजयी झाला. मुंबई विद्यापीठाला मात्र पटियाळाच्या पंजाबी विद्यापीठाकडून २७ धावांनी पराभव स्वीकारावा लागला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना पंजाबी विद्यापीठाने मुंबईसमोर १६१ धावांचे आव्हान ठेवले. प्रत्युत्तरादाखल मुंबई विद्यापीठाचा संघ २० षटकांत ८ बाद १३४ इतकीच धावसंख्या उभारू शकला. मुंबईच्या सिद्धेश चव्हाण याने नाबाद ७४ धावा करीत विजयासाठी एकाकी झुंज दिली. सिमला विद्यापीठ सिमला आणि महर्षी दयानंद विद्यापीठ रोहटक यांच्यातील सामनाही रोमहर्षक ठरला. सिमला विद्यापीठाने प्रथम फलंदाजी करताना रोहटकसमोर ८ बाद १२८ धावांचे आव्हान ठेवले. नरेंद्र कुमारच्या ३८ आणि गौरव कुमारच्या ४३ धावांच्या बळावर रोहटकच्या संघाने हे आव्हान गाठले.

# शिवाजी विद्यापीठ अव्वल साखळीत

कोल्हापूर : पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या पुरुष संघाने राजस्थानच्या अजमेर विद्यापीठाला हरवून अव्वल साखळी फेरीत प्रवेश केला. शिवाजी विद्यापीठासह मुंबई,कोटा व गोंडवाना विद्यापीठांचे संघ अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत.

पहिल्या साखळी सामन्यात शिवाजी विद्यापीठाने मुंबई विद्यापीठाला हरवून अव्वल साखळी फेरीतही विजयी सलामी दिली. राजस्थानमधील कोटा येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत गतवर्षीच्या मानांकित शिवाजी विद्यापीठ पुरुष संघाचा सामना अजमेर विद्यापीठाशी झाला. कर्णधार ऋषिकेश देसाईंच्या नेतृत्वाखालील शिवाजी विद्यापीठाने ४२-२४ अशा गुणांनी सामना जिंकला. सलग दुसऱ्या वर्षी अखिल भारतीय स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या शिवाजी विद्यापीठ संघात ऋषीकेश देसाई, सौरभ पाटील, सौरभ कुलकर्णी, प्रतिक पाटील, योगेश पाटील, अविनाश पाटील, शुभम पाटील, मनोज नार्वेकर, गुरुराज घोडके,निखिल सुर्यवंशी, सौरभ वगरे,आणि सौरभ बा.पाटील या खेळाडूंचा समावेश आहे. त्यांना डॉ. रमेश भेंडिगीरी व प्रा.जहांगीर तांबोळी यांचे मार्गदर्शन मिळाले आहे.

# संविधान दिनानिमित्त विद्यापीठात व्याख्यान

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने संविधान दिनानिमित्त व्याख्यान आयोजित केले आहे. सुप्रसिद्ध लेखक व विचारवंत डॉ. श्यामसुंदर मिरजकर यांचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान' विषयावर सोमवार, दि. २५ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० वा. मानव्य शास्त्र सभागृह येथे व्याख्यान होणार आहे. याचा लाभ सर्वांनी घ्यावा, असे आवाहन केंद्राचे संचालक प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले.

# शिवाजी विद्यापीठाचा महर्षी दयानंद विद्यापीठावर विजय



## अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कबड्डी स्पर्धेसाठी विद्यापीठाचा संघ पात्र

कसबा बावडा, ता. २१ : पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष गट कबड्डी स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाने महर्षी दयानंद विद्यापीठ अजमेर संघाचा पराभव करून अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत मानांकन प्राप्त केले. कोटा राजस्थान येथे ही स्पर्धा सुरू आहे.

गतवर्षी मानांकन असल्यामुळे या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघास थेट उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश होता. महर्षी दयानंद विद्यापीठ अजमेर बलाढ्य संघाशी आज झालेल्या सामन्यात शिवाजी विद्यापीठाची अडखळत सुरुवात झाली. सुरुवातीस काही गुण गमावल्यानंतर शिवाजी विद्यापीठाच्या संघाने चढाई व क्षेत्ररक्षण यामध्ये सुसूत्रता आणत विरुद्ध संघावर लोन देत दबाव वाढवला. मध्यंतराला शिवाजी विद्यापीठाकडे पाच गुणांची आघाडी होती. मध्यंतरानंतर कर्णधार ऋषिकेश देसाई, प्रतीक पाटील, शुभम पाटील यांच्या अभेद क्षेत्ररक्षणाने विरुद्ध संघाच्या चढाई पटूंची पुरती दमछाक केली. प्रो. कबड्डीत बंगाल वॉरियर्सकडून चमकदार कामगिरी केलेला कोल्हापूरचा सौरभ पाटील, सौरभ कुलकर्णी व मनोज नार्वेकर यांच्या पल्लेदार चढायांमुळे विरुद्ध संघाचे क्षेत्ररक्षण खिळखीळे केले.

सामन्याची शेवटची पाच मिनिटे शिल्लक असताना शिवाजी विद्यापीठाच्या अंगणात फक्त दोन खेळाडू शिल्लक होते. यावेळी प्रशिक्षक रमेश भेंडीगिरी यांनी चढाईसाठी मनोज नार्वेकर या बदली खेळाडूस मैदानात उतरले. प्रशिक्षकांचा विश्वास सार्थ ठरवत मनोजने चढाईत गुण वसूल करत संघाचा हुकमी चढाईपटू सौरभ पाटील याला मैदानात आणलेच; पण याच वेळी क्षेत्ररक्षणात पकड करून सुपर टॅकलचा अधिकचा गुण वसूल केला. त्यानंतर सौरभ पाटीलने चौफेर चढाया करत आपल्यावर आलेले लोणचे संकट टाळताना विरुद्ध संघावर लोन दिला. हा लोन जर शिवाजी विद्यापीठावर बसला असता तर संघ अडचणीत आला असता. शेवटी शिवाजी विद्यापीठाने हा सामना २२ - ४४ असा जिंकत अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेसाठी मानांकन प्राप्त केले.

त्यानंतर सायंकाळी झालेल्या साखळी सामन्यात शिवाजी विद्यापीठाच्या संघाने मुंबई विद्यापीठास ५५ - १० अशा फरकाने हरवत साखळीतील पहिला विजय नोंदविला.

संघासोबत आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक रमेश भेंडिगिरी तसेच संघ व्यवस्थापक म्हणून प्रा. जहांगीर तांबोळी हे गेले आहेत.

# चर्मकारांना नवप्रवाहाची जाणीव करून देणार

## शिवाजी विद्यापीठ आपल्या दारी उपक्रम

**कोल्हापूर, ता. २१ : कोल्हापूरचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आणि वैभव असणाऱ्या कोल्हापुरी चप्पलचे निर्माते आणि विशेषतः विक्रेते यांना बाजारामधील नवप्रवाहांची जाणीव करून देणे आणि त्यांच्या विपणन पद्धतीमध्ये कालसुसंगत बदल घडवून आणण्यासाठी शिवाजी विद्यापीठ कटिबद्ध आहे. त्या दृष्टीनेच विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्या माध्यमातून थेट कोल्हापूरच्या चप्पल लाइनमध्येच एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे.**

एका अर्थाने या चप्पल विक्रेत्यांच्या कौशल्य विकासासाठी विद्यापीठ आपल्या दारी हा उपक्रम आहे, अशी भावना कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आज येथे व्यक्त केली. त्यांनी या उपक्रमांतर्गत चप्पल लाईनला भेट दिली.

केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव म्हणाले, ''केंद्राच्या दहा प्रशिक्षित प्रशिक्षकांच्या मार्फत चप्पल लाईन येथील व्यावसायिकांना त्यांच्या व्यवसायाला पूरक अशा बाबींचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यामध्ये विविध विपणन कौशल्यांबरोबरच प्रदर्शन कौशल्य, जाहिरात कौशल्य, प्रसिद्धी कौशल्य, ग्राहक सुसंवाद कौशल्य, विक्री मूल्य निर्धारण कौशल्य, साठा कौशल्य, ब्रँडिंग व पॅकिंग कौशल्य, वर्तन कौशल्य, स्थानिक व बाह्य ग्राहकांशी संवाद कौशल्य आदी अनेक बाबींचे प्रशिक्षण चप्पल लाइनमधील व्यावसायिकांना देण्यात येणार आहे.''

कोल्हापूर क्लस्टरचे भूपाल शेट्ये म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठाने कोल्हापुरी चप्पल व्यावसायिकांसाठी सातत्याने सकारात्मक भूमिका घेऊन काम चालविले आहे. त्याचा परिणाम म्हणून चप्पल निर्माते आणि व्यावसायिकांमध्येही एक प्रकारची जागृती होऊ लागली आहे.''

यावेळी महेश चव्हाण यांनी आभार मानले. डॉ. केदार मारुलकर, क्लस्टरचे अध्यक्ष अरुण सातपुते उपस्थित होते.

दरम्यान दिवसभरात डॉ. गुरव, डॉ. मारुलकर, श्री. चव्हाण यांच्यासह डॉ. व्ही.एस. खंडागळे, डॉ. गजानन राशिनकर, डॉ. के.बी. पाटील, डॉ. पी.एम. देवळी, शिवप्रसाद शेटे, प्रियांका नायक-तिवरे आणि श्री. लिटॉन या प्रशिक्षकांनी कोल्हापुरी चप्पल विक्रेत्यांना विविध कौशल्यांचे प्रशिक्षण दिले.